खास

हिंदी चित्रपटात दांडुका फिरवणारा नाहीतर पिस्तूल रोखून दम देणारा पोलीस दिसला नाही असं कधीच होत नाही. अर्थात पडद्यावर नेहमीच त्याचा पोलिसी खाक्या न दिसता कधी कधी तो रिलीफ बनूनही समोर येतो.

□ नरेंद्र उपाध्याय

पडद्यावर खाकी वर्दीतला विनोद



दिग्दर्शक म्हणून बनवलेला पहिला चित्रपट चोर पोलीस अमजद खानला महाग पडला.



जोहर महेमूद इन हाँगकाँग

आपल्या कॉमेडीयनमध्ये क्वचित एखादा कलाकार असा असेल ज्याने पोलिसाची भूमिका कधीच साकारली नाही. अगदी जॉनी वॉकरपासून जॉनी लिव्हरपर्यंत सगळ्यांनी ही खास भूमिका साकारली आहे. हिंदी चित्रपटात तर हसवणाऱ्या पोलिसांची अजिबात उणीव नाही. एखाद्या पोलिसी पात्राला विनोदी शेड असली तर समजू शकतं. पण कोणी चित्रपटाच्या माध्यमातून या खात्यालाचं हास्यास्पद बनवण्याचा प्रयत्न केला, तर मात्र ते लोकांना आवडत नाही.

प्रेक्षकांना पडद्यावरचा गंभीर पोलीस पाहायला आवडत नसावा. *पांडू हवालदार* या मराठी चित्रपटात दादा कोंडकेंनी पोलिसाच्या पोशाखात जी अप्रतिम कॉमेडी पेश केली, त्याला तोड नव्हती. तो चित्रपट मराठीतला सुपर डुपर हिट ठरला. असरानीने त्यावरून *दो हवालदार* नावाचा चित्रपट बनवला, पण असरानीचा प्रयत्न पार फसला.


राजेश खन्ना, योगीता बाली यांना घेऊन मेहमूदने बनवलेला *जनता हवालदार*ही यशस्वी चित्रपटांच्या यादीत होता. यात राजेश खन्ना-योगीता गंभीर भूमिकेत होते. पण मेहमूदने कॉमेडी पोलीस बनून प्रेक्षकांनां पोट धरून हसवलं. या भूमिकेविषयी बोलताना मेहमूद म्हणाला होता, 'ही भूमिका माझ्या आयुष्यभर लक्षात राहील. यात मी लोकांना नुसतं हसवलंच नाही तर संवेदनशील दृश्यांतून रडवलंसुद्धा.'


अशी भूमिका क्वचितच एखाद्या कॉमेडीयनच्या नशीबी येते. आपल्याकडे माकडचेष्टा करणाऱ्या कॉमेडीयन्सची काही उणीव नाही. कॅरेक्टरऐवजी ते कॅरीकेचर बनून पडद्यावर येतात. पण पोलिसाच्या पोशाखात अशा माकडचेष्टा शोभत नाहीत. १९६० ते १९८०च्या दरम्यात अशाच पद्धतीचे अनेक चित्रपट आले. प्रेक्षक विनोदी भूमिका स्वीकारतात, तिला दाद देतात. पण केव्हा? तर सर्वसामान्यांच्या मनाला



*पांडू हवालदार*चं यश पाहून असरानीने दो हवालदार बनवला, पण तो आपटला...

मेलामध्ये फैजल, जॉनी लिव्हर, आमिर आणि असरानी







चोर पोलीसमध्ये अमजद, निरूपा रॉय, परवीन आणि शत्रुघ्न

भिडणारी व्यक्तिरेखा असेल तेव्हा. अंगविक्षेप करण्याने कलाकार विनोदी होत नाही तर तो हास्यास्पद ठरतो. म्हणूनच आपल्याकडे *पोलीस अॅकॅडमी*सारखे चित्रपट बनू शकत नाहीत. कारण आपण पोलिसांच्या विनोदाला तमाशा म्हणून स्वीकारू शकत नाही. *जोहर मेहमूद इन गोवा*मध्ये दोन्ही श्रेष्ठ कॉमेडीयन्सनी दर्शकांची वाहवा मिळवली होती. ती केवळ आपल्या प्रतिभेच्या जोरावर.

'मी आजवर अनेक चित्रपटांत हवालदाराची भूमिका साकारली आहे. अनेकदा त्या पोशाखात हातात दंडुका घेऊन वावरताना एखादा तरी चोर पकडावा अशी खुमखुमी येते. मला या खात्याविषयी नितांत आदर आहे. म्हणूनच ओव्हर अॅक्टिंग करणारा कलाकार असूनही विनोदी पोलीस व्यक्तिरेखा साकारतानाही मी कधीच मर्यादा ओलांडली नाही,' जॉनी लिव्हर म्हणतात.

परंतु अमजद खानने दिग्दर्शनाच्या क्षेत्रात पदार्पण करताना बनवलेल्या *चोर पोलीस* या कॉमेडी चित्रपटाची पुढे ट्रॅजेडी झाली. त्यात पोलीस खात्यावर प्रचंड टिका करण्यात आली होती. प्रकरण कोर्टात गेलं. अखेरीस चित्रपट बॅन करण्यात आला. अनेक वर्ष हा चित्रपट कोर्ट कचेऱ्यांच्या चक्करमध्येच अडकला होता.

अनेक चित्रपटांमधून पोलीस बनून कॉमेडी करणाऱ्या शक्ती कपूरच्या मते, 'अनेकदा कॉमेडी करताना सेटवर आयत्यावेळी संवाद दिले जातात. आणि मग आम्ही ते तसेच बोलून मोकळे होतो. पण हे गैर आहे. संवादाचा नीट विचार करून ते योग्य पद्धतीने बोलल्यास व्यक्तिरेखेलाच अधिक चांगला न्याय मिळू शकतो. एखादा शब्दही चुकीचा गेल्यास मी तो डबिंगच्या वेळी सुधारतो. पोलीस खात्यासारख्या जबाबदार खात्याशी संबंधित व्यक्तिरेखा प्रेक्षकांच्या लेखी उपहासाला पात्र ठरू नये, असा माझा प्रामाणिक प्रयत्न असतो.' मराठी-हिंदीत कॉमेडीयन म्हणून चमकलेले अशोक सराफ म्हणतात, 'कुठल्याही पेशाशी संबंधित पात्र साकारताना, आणि त्या विशिष्ट पेशाचा गणवेश चढवल्यानंतर त्याच्याशी बांधिलकी कलाकाराला मान्य करावीच लागते. *कुरुक्षेत्र*मध्ये दारूडा हवालदार पी. के. मोरेचं पात्र साकारणाऱ्या सयाजीच्या कामाला दाद मिळाली होती. 'पोलीस खात्यातही सगळ्या प्रकारचे लोक असतातच,' तो म्हणतो. एरव्हीही प्रत्येक कलाकाराने आपल्या कारकीर्दीत एकदा तरी पोलिसाची भूमिका साकारावी. कारण पोलिसाच्या आयुष्यातही आसू आणि हसू दोन्ही असतंच. ✯

☞ लेखणी उचला...:पान नं. २९ वरून

सांप्रत कालिन युग हे गतीमान युग आहे. थांबला तो संपला, असा या युगाचा नारा आहे. असं समजणं म्हणजे काळाची पावलं ओळखून वागणं. हे प्रत्येकाचं कर्तव्य आहे. पण हल्ली आपली अवस्था कळतं पण वळत नाही अशी झाली आहे आणि याला कारण म्हणजे टीव्हीचा अती वापर. अती वापरामुळे आपलं विशेषतः नव्या पिढीचं जीवन बरबाद होईल, असा संभाव्य धोका वाटू लागलाय. यामुळे या तरुण पिढीचं किंबहुना प्रौढांचंही जीवन उफराटं वळण घेऊ लागलंय. टीव्हीने आपलं जीवन सुस्त, ऐदी, दैववादी, भोगवादी, स्वार्थी बनवलंय.

— श्री. एम. एन. म्हात्रे, वडगाव, पेण.



टीव्हीमुळे आपल्याला पाहिजे तसं मनोरंजन सहज उपलब्ध होऊ शकतं. सतत नवीन कार्यक्रम जगभरातील घडामोडींवर आधारित बातम्या, शास्त्रीय माहिती, आध्यात्मिक माहिती मिळू शकते. नव्या पिढीला माहितीची अनेक दालनं टीव्हीमुळे खुली होतात. पण याच टीव्हीचा अतिरेक झाला तर आरोग्यावर, क्रियाशीलतेवर परिणाम होऊ शकतो. समोर भरलेलं ताट आहे म्हणून सगळंच फस्त करावं असं नाही. तर आपली भूक विचारात घेऊन खाल्लं पाहिजे. टीव्हीच्या बाबतीतही तेच म्हणता येईल.

— सौ. नेहा श्रीनिवास मुळे, सोलापूर.

टीव्हीमुळे कुठे काय घडतं ते प्रत्यक्ष पहातां येऊं लागलं. मॅच प्रत्यक्ष घरच्या घरीच पहाण्याचं सौभाग्य लाभलं. अवकाशांत केली जाणारी प्रक्षेपणं पहाता येऊ लागली. संसदेत चालणाऱ्या चर्चा आणि होणारे गोंधळ पहाता येऊ लागले. म्हणजेच टीव्हीमुळे क्षणांत जगाशी संबंध राखता येऊ लागला असं म्हणायला हरकत नाही. पण हाच टीव्ही जेव्हा जाहिराती देऊन काही विशिष्ट मालिका पैशाचं पाठबळ देणाऱ्या केबल वाहिन्यांच्या जाळ्यात अडकत गेल्या तेव्हा तेच उत्कर्ष करून देणारं माध्यम अधोगतीकडे नेऊ लागलं. त्यातून केलं जाणारं प्रक्षेपण कोणत्या दर्जाचं आहे ह्याचं तारतम्य न राखल्यामुळे सामाजिक आणि नैतिक ऱ्हासाचं तो कारण बनला आहे असंच मला वाटतं.

— वसंत स. सोमणे, ठाणे(प.).

दूरदर्शन हे नवतंत्रज्ञानाचं अपत्य आहे. दूरध्वनी, आकाशवाणी ही सुद्धा त्याचीच अपत्यं आहेत. त्यांच्यामुळे जग हे छोटंसं खेडं झालं. सद्विचार, वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवी मूल्यं यांचं सामाजिकीकरण करण्यासाठी टीव्हीचा उत्तम उपयोग होऊ शकतो. परंतु याच टीव्हीचा दुरुपयोग होतोय. त्यामुळे काही दीडशहाणे टीव्हीला इडियट बॉक्स म्हणून संबोधू लागले. इडियट हा शब्द सारासार विचार न करणाऱ्या माणसाला लागू होतो. टीव्हीवर कार्यक्रम देणारे, योग्यायोग्यतेचा विचार न करता टीव्हीवरील प्रत्येक कार्यक्रम पाहणारे इडियट असू शकतात.

— साहेबराव निगळ, घोडबंदर रोड, ठाणे. ✯

'लेखणी उचला' स्पर्धेचा पुढचा प्रश्न पुढील म्हणजे १६-३१ मेच्या अंकात प्रसिद्ध करण्यात येईल.